सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in

**परिपत्रक क्र. ८४ / २०२५**

**विषय : पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर पीएच्.डी. विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निराकरण करणेबाबत...**

पीएच्.डी. संशोधक विद्यार्थ्यांचा प्रशासकीय कामात कमीत कमी वेळ खर्च व्हावा व त्यांना प्रभावीपणे संशोधन करण्यास वेळ मिळावा, याकरिता विद्यापीठाकडून पीएच्.डी. प्रवेशापासून ते पदवी घोषित होईपर्यंत सर्व सुविधा पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पीएच्.डी. विद्यार्थ्यांना तक्रार करण्याबाबत पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर सुविधा विकसित करण्यात आली असून ती त्यांना उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर प्रणालीवर काही विद्यार्थ्यांनी तक्रारी दाखल केल्या असून संशोधन मार्गदर्शक व संशोधन केंद्र यांना त्यांचे स्तरावर निराकरण करणेस्तव किंवा पुढे शिफारस करणेस्तव लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

त्याअनुषंगाने मा. विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक, 'सर्व संलग्नित संशोधन केंद्रे व सर्व संबंधित संशोधन मार्गदर्शक यांना कळविण्यात येते की, आपल्या लॉगीनमध्ये पीएच्.डी. ट्रॅकींग प्रणालीवर प्राप्त होणा-या तक्रारींचा वेळोवेळी आढावा घेऊन त्यांचे तातडीने निकारण करण्याची कार्यवाही करावी.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/ ८६० )
दिनांक: ०७/०४/२०२५ )

७/४/२०२५
(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

1. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
2. मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संशोधन केंद्रे/संस्था.
3. सर्व मान्यताप्राप्त संशोधन मार्गदर्शक, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\General Circulars\Ph.D. online Greivances.docx